साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डूभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११०

दैनिक साहसिक
epaper
www.dsahasik.in
सजग समाजाचा दक्ष प्रहरी




वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा, गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १४ अंक :१७७ सोमवार १८ जानेवारी २०२१ मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

### सुविचार

आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढय़ावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल.

### चारोळी

आई सर्वांनाच हवी
असते आपली हाक
ऐकण्यासाठी
हवे तेव्हा आपल्यासाठी
आपले म्हणून
राहण्यासाठी .

### हसा जरा जपून..

**गुरूजी :** खरं सांग बंड्या, नाहीतर चड्डी काढून मारेन तुला...
**बंड्या :** पण गुरूजी, सगळी चुक माझी आहे तुम्ही का चड्डी काढताय...

# मुंबई कोर्टाच्या न्यायाधीशास सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

*** सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप**

***आरोपींना मदत करण्यासाठी न्यायाधीशाने कायद्याविरुद्ध काम केल्याचा फिर्यादीचा आरोप**

*** कोणताही सामान्य नागरिक कोणत्याही न्यायाधीशांविरुद्ध कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाईसाठी याचिका दाखल करु शकतो व सर्वोच्च न्यायालयाला त्या याचिकेतील मुद्यांवर निर्णय द्यावाच लागेल, असा कायदा सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने न्या. कर्णन प्रकरणात ठरवून दिला आहे. अनेक प्रकरणात चुकीचे आदेश देणाऱ्या उच्च व सर्वोच्च न्यायालयापर्यंतच्या न्यायाधीशांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून न्या. शमीत मुखर्जी, न्या. निर्मल यादव सारख्या न्यायाधीशांना अटक, आरोपपत्र दाखल करणे अशा कारवाया सीबीआयने केल्या आहेत.**

*** सुप्रिम कोर्टाचे रजिस्ट्रार यांना याचिका दाखल करुन घेण्यास नकार देण्याचा अधिकार नसून याचिका योग्य की अयोग्य हे फक्त न्यायालयच ठरवू शकते. असा कायदा संविधान पीठाने ठरवून दिला आहे. त्या विषयावर सुद्धा सर्वोच्च न्यायालय सुनावणी करणार आहे.**



**ॲड. निलेश ओझा**
**राष्ट्रीय अध्यक्ष**
**इंडियन बार असोसीएशन**



**ॲड. विवेक रामटेके**
**चेअरमन**
**ऑल इंडिया एस.सी., एस. टी. ॲन्ड मायनॉरीटी लॉयर्स असोसिएशन**



**रशिदखान पठान**
**राष्ट्रीय सचिव**
**मानव अधिकार सुरक्षा परिषद**

**साहसिक वृत्त / १७ जानेवारी**
**विशेष संवाददाता/ नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मुंबई येथील बोरीवलीचे प्रथम श्रेणी न्यायालयाचे न्यायाधीश ए. पी. खानोरकर यांना याचिकाकर्ते मनुभाई पटेल या-ंच्या कोर्ट अवमानना अंतर्गत प्रकरणातील याचिकेवर नोटीस देत तीन आठवड्याच्या आत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहे.

याआधी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सी. एस. कर्णन या-ंना कोर्ट अवमानना प्रकरणात सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली होती. तसेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांच्याविरुद्ध सुद्धा कारवाई झाली होती. न्यायाधीश ए. पी. खानोरकर यांनी सुरेन्द्र मिश्रा यांच्या प्रकरणात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या व मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना केली असून सुरेंद्र मिश्रा यांच्या प्रकरणात सुद्धा त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती याचिका कर्त्याचे वकिल व इंडियन बार असोसिएशनचे



राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. निलेश ओझा यांनी दिली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनुभाई पटेल हे निवृत्त वरीष्ठ अधिकारी आहेत. त्यांच्या प्रकरणात न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या दिशा - निर्देशानुसार प्रकरणाची सुनावणी त्वरीत घेण्यासाठीची विनंती न्यायाधीश खानोरकर यांनी मान्य न करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना करून विशिष्ट आरोपींना गैरफायदा पोहचविण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई करण्यासाठी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.

सर्वोच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार यांनी ती याचिका दाखल करून घेण्यास नकार दिला. रजिस्ट्रार यांनी असे कारण दिले की, न्यायाधीशांना कारवाईपासून संरक्षण असून परवानगी घेतल्याशिवाय कोर्ट अवमाननाची याचिका दाखल करता येणार नाही. तसेच रजिस्ट्रार यांचे असेही म्हणणे होते की सर्वोच्च न्यायालयाचे आदेश हे त्या न्यायाधीशाला उद्देशून नव्हते तर ते सर्वसाधारण निर्देश होते. त्यामुळे त्या आदेशाचे उल्लंघन करणे हा गुन्हा होत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारचे आदेश हे सर्वोच्च न्यायालयाच्याच संविधान पीठाच्या निर्देशाविरुद्ध असल्यामुळे मनुभाई पटेल यांनी त्या आदेशाला आव्हान दिले. त्यांनी त्यांच्या याचिकेमध्ये विविध न्यायनिवाडे दाखल करुन सर्वोच्च न्यायालयास पटवून दिले की, रजिस्ट्रारचे आदेश कसे चुकीचे आहेत. मनुभाई पटेल यांचे मुद्दे विचार करता येण्याजोगे व संयुक्तीक असल्याची खात्री झाल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने दि.१३ जानेवारी २०२० रोजी न्यायाधीश ए. पी. खानोरकर यांना नोटीस जारी करण्याचे आदेश पारीत केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पीठाने P. Surendran (2019) 9 SCC 154 प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की, न्यायालयाचा रजिस्ट्रार हा न्यायाधीश नसतो आणि

(उर्वरित पान २ वर)

## सर्वसामान्य नागरिकांना कोरोनाची लस मोफत द्यावी

### आरोग्य मंत्र्यांची केंद्र सरकारकडे मागणी



**वृत्तसंस्था/ १७ जानेवारी**
**नवी दिल्ली :** कालपासून देशभरात कोरोना लसीकरणाला सुरुवात झाली आहे. सर्व राज्यांमध्ये सुरुवातीला आरोग्य कर्मचाऱ्यांना ही लस दिली जात आहे. दरम्यान, सर्वसामान्य नागरिकांना लस मोफत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब येथील एका हॉस्पिटलचे उद्घाटन आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पत्रकारांशी ते बोलत होते.

यावेळी टोपे म्हणाले की, 'लसीकरणासाठी केंद्र सरकाककडून चांगले सहकार्य मिळत आहे. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचाऱ्यांना लस दिली जात आहे. सर्वसामान्यांनादेखील ही लस मोफत द्यावी, अशी मागणी आम्ही केंद्रीय आरोग्य मंत्र्या-ंकडे केली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्र्यांसोबत शनिवारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक झाली. या बैठकीमध्ये मोफत लस देण्याची मागणी केली असून या लशीच्या संपूर्ण खर्चाचा भार हा केंद्र सरकारने उचलावा', अशी चर्चा झाल्याची माहिती राजेश टोपे यांनी दिली.

टोपे पुढे म्हणाले की, 'कोव्हिन ॲपच्या तांत्रिक त्रुटीमुळे लसीकरणाच्या पहिल्या दिवशी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी अडथळे निर्माण झाले होते. त्यामुळे पहिल्या दिवशीच १०० टक्के लसीकरण होवू शकले नाही. यापुढे राज्यात आठवड्यातून चार दिवस लसीकरण केले जाणार आहे. लवकरच बाजारामध्ये ५ ते ६ लशी येणार आहे. त्यामुळे खरेदी करण्यासाठी बाजारामध्ये लस उपलब्ध असणार आहे त्यामुळे लसीचा तुटवडा होणार नाही', अशी माहितीही टोपे यांनी दिली.

## जी-७ परिषदेसाठी मोदींना आमंत्रण

## ब्रिटनच्या पंतप्रधानांनी मोदींना केले आमंत्रित



**वृत्तसंस्था/ १७ जानेवारी**
**नवी दिल्ली :** ब्रिटनने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जूनमध्ये होणाऱ्या जी-७ परिषदेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. जी-७ मध्ये अमेरिका, फ्रान्स, कॅनडा, ब्रिटन, जर्मनी, जपान आणि इटली या देशांचा समावेश आहे. सर्व सदस्यीय देश आळीपाळीने जी-७च्या वार्षिक परिषदेचे आयोजन करतात. यावर्षी ११ ते १३ जून दरम्यान ब्रिटनच्या कॉर्नवॉलमध्ये ही परिषद होणार आहे. त्याचबरोबर ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉनसन म्हणाले की, शिखर परिषदेच्या आधी ते स्वत: भारत भेटीवर येतील.

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरियाला देखील आमंत्रित केले निवेदनात म्हटले की, भारतव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरियालाही अतिथी देश म्हणून शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले गेले आहे. या शिखर परिषदेत या ३ देशांच्या सहभागामुळे जगातील लोकशाही व तंत्रज्ञानाने प्रगत राष्टांमधील सहकार्य आणखी वाढण्यास मदत होईल. या परिषदेत कोरोनाव्हायरस, हवामान बदल आणि व्यापाराशी संबंधित जागतिक मुद्द्यांवर चर्चा होऊ शकते.

**जी-८ ते जी-७**

२०१४ पर्यंत जी-७ ला जी-७ म्हणून ओळखले जात असे. या परिषदेत रशियाचा देखील समावेश होता. मात्र रशियाने क्राइमियावर हल्ला करून तो प्रदेश ताब्यात घेतला. आताही तिथे रशियाचा अधिकार आहे. तत्कालीन अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी याला कडाडून विरोध दर्शविला आणि रशियाला या संघटनेतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविला. ट्रम्प यांची इच्छा होती की रशिया पुन्हा संघटनेत सामील व्हावा, परंतु उर्वरित देश हे मान्य करण्यास तयार नव्हते.

## सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतरही आंदोलन का?

## शेतकऱ्यांनी हट्ट सोडत चर्चा करावी : कृषी मंत्री तोमर



**वृत्तसंस्था/ १७ जानेवारी**
**नवी दिल्ली :** केंद्र सरकारनं लागू केलेले नवे कृषी कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी दिल्लीच्या वेगवेगळ्या वेशींवर शेतकऱ्यांचं आंदोलन सुरु आहे. आज शेतकरी आंदोलनाचा ५३वा दिवस आहे. कृषी मंत्री नरेंद्र तोमर यांनी शेतकरी आंदोलनाबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. जर सुप्रीम कोर्टाने कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्थगिती दिली आहे, तर शेतकरी आंदोलन का करत आहेत? असं त्यांनी म्हटलं आहे.

कृषी मंत्री नरेंद्र सिंह तोमर यांनी म्हटलं आहे की, सुप्रीम कोर्टाने कायद्याची अंमलबजावणी करण्यावर स्थगिती दिली आहे. तर शेतकरी धरणे का धरत आहेत. कायदे रद्द करण्याशिवाय जर दुसरी कोणती मागणी असेल तर शेतकऱ्यांनी सांगावी. सरकार मोकळ्या मनानं चर्चा करेल. कोणताही कायदा संपूर्ण देशासाठी बनतो. कोर्टानं जर कायद्यांच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे तर मग शेतकऱ्यांचे जे मुद्दे आहेत ते त्यांनी कमिटीसमोर ठेवावेत, असं तोमर यांनी म्हटलंय.

ते पुढे म्हणाले की, ' आम्ही शेतकरी संघटनांना एक प्रस्ताव दिली होता. ज्यामध्ये आम्ही मार्केट, व्यापाऱ्यांची नोंदणी आणि अन्य मुद्द्यांवर त्यांच्या आक्षेपांना दूर करण्यावर सहमती दर्शवली होती. सरकारनं पराली कायदा आणि विद्युत संबंधी कायद्यांबाबतही निर्णय दिला आहे. मात्र या संघटना केवळ कायदे रद्द करु इच्छित आहेत, असं तोमर म्हणाले.

**शुक्रवारची बैठकही निष्फळ**

शेतकरी संघटना आज देशाच्या प्रजासत्ताक दिनी म्हणजेच, २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ट्रॅक्टर परेडसंदर्भात रुट प्लान करणार असून रणनितीवरही चर्चा करणार आहेत. यासाठी आज सिंघु बॉर्डरवर संयुक्त किसान मोर्चाची बैठक पार पडणार आहे. दरम्यान, शुक्रवारी केंद्र सरकार आणि शेतकऱ्यांमध्ये पार पडलेली बैठक निष्फळ ठरली आहे. पुढील बैठक १९ जानेवारी रोजी पार पडणार आहे. तीन केंद्रीय मंत्र्यांसोबत शुक्रवारी पार पडलेल्या बैठकीत शेतकरी तीनही कृषी कायदे रद्द करण्याच्या आपल्या मागणीवर ठाम राहिले. तर केंद्र सरकार कायदे रद्द न करता त्यामध्ये काही बदल करण्याच्या मागणीवर ठाम होतं. जवळपास पाच तास चाललेल्या बैठकीत कोणताही तोडगा निघालेला नाही.

केंद्र सरकारसोबतच्या बैठकीनंतर भारतीय किसान युनियनचे प्रवक्ते राकेश टिकैत यांनी कृषी कायदा रद्द

(उर्वरित पान २ वर)

## 'शिवसेनेला मतांची चिंता, त्यामुळेच नामांतराचा 'सामना' सुरु', बाळासाहेब थोरातांची 'रोखठोक' टीका



**वृत्तसंस्था/ १७ जानेवारी**
**मुंबई :** औरंगाबाद महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर औरंगाबाद शहराचं नामांतर करण्याच्या हालचाली ठाकरे सरकारकडून सुरु झाल्या आहेत. यातच सीएमओ म्हणजे मुख्यमंत्री कार्यालयाच्या ऑफिशियल ट्विटर हॅन्डलवरुन करण्यात आलेल्या ट्विटमध्ये औरंगाबादचा उल्लेख संभाजीनगर असा करण्यात आला होता. त्यानंतर काँग्रेसनं विरोध दर्शवला होता. विरोधानंतरही शिवसेनेकडून नामांतराबाबत वक्तव्य केली गेली. यावर आता काँग्रेस नेते आणि मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ट्वीट करत पुन्हा एकदा नामांतराबाबत भूमिका स्पष्ट केली. नामांतराचे राजकारण कोणाला प्रिय? पाच वर्षे सत्तेत असलेलेच ढोंगीपणा करत आहेत, असं बाळासाहेब थोरांत यांनी म्हटलंय. शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आपलं सदर रोखठोकमधून काँग्रेसवर अप्रत्यक्ष निशाणा साधला होता. 'औरंगजेबाच्या नावाने महाराष्ट्रात तरी एखादे शहर असू नये. ही धर्मांधता नसून शिवभक्ती म्हणा, महाराष्ट्राचा स्वाभिमान म्हणा, नाहीतर इतिहासाचे भान; पण असा औरंगजेब कुणाला प्रिय असेल तर त्यांना कोपरापासून साष्टांग दंडवत! हे वागणं सेक्युलर नव्हे!, असं म्हणत संजय राऊत यांनी काँग्रेसला टोले लगावले होते. त्यानंतर बाळासाहेब थोरात यांनी ट्वीट करत उत्तर दिलं आहे.

**भूमिका स्पष्ट केल्यानंतर सल्ला देणाऱ्यांची संख्या वाढली**

ट्वीटमध्ये थोरात म्हणतात, औरंगाबादच्या नामांतराच्या मुद्द्यावरून महाराष्ट्राच्या राजकारणात धुरळा उडविला जात आहे. शिळ्या कढीला ऊत आणून काही मंडळी आपला स्वार्थ साधू इच्छित आहे. काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर सल्ला देणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे, मात्र मागील पाच वर्षे एकमेकांसोबत सत्तेत असलेले आज नामांतराचे राजकारण करत आहेत, हा ढोंगीपणा नाही तर काय आहे? केंद्रात आणि राज्यात हे दोघेही मांडीला मांडी लावून सत्ता भोगत होते, तेव्हा यांना नामांतराचा मुद्दा का आठवला नाही? असा सवाल त्यांनी केला आहे.

'औरंगजेब कोणाला प्रिय, हे वागणं सेक्युलर नव्ह'; औरंगाबादच्या नामांतरावरुन शिवसेनेचा आक्रमक सूर
दोघांनीही खरंतर औरंगाबादच्या

(उर्वरित पान २ वर)